**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः31.12.2024** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या,**

१. अंतराळात दोन उपग्रहांची जोडणी करण्यासाठीच्या स्पेडेक्स मोहिमेचं इस्रोकडून यशस्वी प्रक्षेपण

२. पुढच्या शंभर दिवसांत करायच्या कामांचा मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा

३.नववर्षाच्या स्वागतासाठी राज्यातील पर्यटनस्थळांवर गर्दी; प्रशासनही सज्ज

४.जेजुरीत सोमवती अमावस्या आणि लातूरसह अन्य जिल्ह्यात दर्शवेळा अमावस्या उत्साहात साजरी

आणि

५.बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेत ऑस्ट्रेलियाची 2-1 नं आघाडी

**इस्रो**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोनं आपल्या स्पेडेक्स मोहीमेअंतर्गत काल श्रीहरीकोटा इथल्या उपग्रह प्रक्षेपक तळावरुन दोन उपग्रह अवकाशात सोडले. या मोहिमेअंतर्गत अंतराळात दोन उपग्रहांची जोडणी अर्थात डॉकिंग करण्यात येणार आहे. काल एसडीएक्स 01 आणि एसडीएक्स 02 हे दोन्ही उपग्रह पृथ्वीपासून काही अंतरावरील आपापल्या कक्षांमध्ये स्थिरावले, आगामी काही दिवसात दोन्ही उपग्रहांमधील अंतर कमी होईल आणि त्यानंतर डॉकिंगची प्रक्रिया सुरू होईल, असं इस्रोचे अध्यक्ष एस सोमनाथ यांनी सांगितलं. चंद्रयान मोहीम आणि भारतीय अंतरिक्ष स्थानकासारख्या महत्त्वाकांक्षी मोहिमांसाठी स्पेडेक्स मोहीम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या मोहीमेच्या यशानंतर, अंतराळात दोन उपग्रह एकमेकांशी जोडणं अथवा विलग करण्याचं तंत्रज्ञान विकसित केलेला भारत जगातला चौथा देश ठरेल.

**मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विविध मंत्रालयांच्या पुढील 100 दिवसांतल्या नियोजित कामांचा आढावा घेतला. कृत्रिम प्रज्ञेचा वापर करुन रस्ते सुरक्षा वाढवण्यावर भर द्यावा, चित्रपट निर्मात्यांना राज्यात चित्रीकरण करण्यासाठी एक खिडकीद्वारे तत्काळ ऑनलाईन परवानगी द्यावी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर एक चांगला व्यावसायिक चित्रपट तयार करावा,

त्यासाठी  शासनाकडून अनुदान देण्यात यावं, अशा विविध सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी, गतीमान, दर्जेदार अंमलबजावणीसाठी आणि लोकसहभागासाठी महाआवास अभियान राबवावं, या आवास योजनेतलं  प्रत्येक घर सौर उर्जेवर करावं, ग्रामविकासाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवाव्यात, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**नव वर्षस्वागत**

आज 31 डिसेंबर सरत्या वर्षाला निरोप देऊन नव्या वर्षाचं स्वागत करण्याचा दिवस. नव्या वर्षाचं उत्साहात आणि जल्लोषात स्वागत करण्यासाठी नागरिक उत्सुक असून विविध पर्यटन स्थळ नागरिकांनी फुलून गेली आहेत. तिथल्या प्रशासनानंही यासाठी जय्यत तयारी केली आहे. मुंबईतल्या समुद्र किनाऱ्यांवर रात्रीच्या वेळी येणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी बेस्ट विविध बसमार्गांवर रात्री 25 जादा बसगाड्या सोडणार आहे. तसंच नागरिकांना दक्षिण मुंबईतील विविध ऐतिहासिक तसंच प्रेक्षणीय स्थळांचा फेरफटका नवीन वातानुकूलित दुमजली इलेक्ट्रिक बसद्वारे घडवण्याच्या हेतूनं बेस्टतर्फे आज हेरिटेज टूर चालवण्यात येणार आहेत.नवीन वर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर, पुण्यात 3 हजार पोलीस-अधिकारी कर्मचारी आणि 700 वाहतूक पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. शहरात 23 ठिकाणी तपासणी करण्यात येणार आहे. पहाटे पाच वाजेपर्यंत मद्याची दुकानं सुरू ठेवण्याला परवानगी आहे. या संबंधीच्या नियमांचं पालन न करणाऱ्या पब आणि हॉटेल्सवर कारवाई केली जाईल, असा इशारा पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.

**रत्नागिरी**

नववर्षाच्या स्वागताला कोकणात जाणाऱ्या पर्यटकांची संख्यादेखील वाढली आहे. या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्हा पोलिस प्रशासनानं बंदोबस्ताची पूर्ण तयारी केली आहे. समुद्रकिनारी जाणाऱ्या पर्यटकांनी काळजी घ्यावी असं आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी केलं आहे,

**पोलिस बंदोबस्त**

कोरेगांव भीमा इथं उद्या होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमासाठी पाच हजार पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे एक हजार जवान आणि 750 पोलीस अधिकारी तैनात असतील, असं पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. कोरेगाव भिमा परिसरात 45 ठिकाणी वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे. 300 सीसीटीव्ही, 10 ड्रोन, आणि 50 पोलीस टॉवरद्वारे परिसरात देखरेख ठेवली जाईल. चोरीच्या घटना रोखण्यासाठी विशेष पोलीस पथकही तैनात असेल असं अमितेश कुमार यांनी सांगितलं.

**लष्कर दिन**

येत्या 15 जानेवारीला होणाऱ्या लष्कर दिन संचलनाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात बॉम्बे इंजिनीअरिंग ग्रुप आणि सेंटर परेड मैदानावर काल लष्कर दिन संचलनाची रंगीत तालीम झाली. 15 जानेवारीला होणारं लष्कर दिन पथसंचलन नागरिकांना पाहता येणार आहे; त्यासाठीच्या नोंदणीकरता तयार केलेल्या  मोबाइल ॲप्लिकेशनचंही उद्घाटनही यावेळी झालं. यंदाच्या लष्कर दिन संचलनाला केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, आणि लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी उपस्थित राहणार आहेत.

**अमावस्या**

रब्बी हंगामात शेत शिवारातल्या पिकांची, शेतातल्या धान्याची पूजा करून, नंतर  मित्र-परिवारासोबत विशिष्ट पदार्थांसह वनभोजनाचा आनंद देणारी दर्शवेळा अमावस्या लातूर जिल्ह्यात काल साजरी झाली. माणसाला निसर्गाजवळ घेऊन जाऊन त्याचं निसर्गाशी घट्ट नातं विणणाऱ्या या सणाविषयी माहिती देताना लातूरचे अशोक अग्रवाल म्हणाले,

**सोमवती अमावस्या**

जेजुरी गडावर काल सोमवती अमावस्या यात्रा मोठ्या उत्साहात  साजरी करण्यात आली. दुपारी एक वाजता देवाच्या उत्सवमूर्तींचा पालखी सोहळा कऱ्हा स्नानासाठी काढण्यात आला. यावेळी देव संस्थानच्या वतीने बंदुकीच्या फैरी झाडून सलामी देण्यात आली. भाविकांनी ‘येळकोट येळकोट जय मल्हार’, ‘सदानंदाचा येळकोट’ असा जयघोष करत भंडार्याचची उधळण केली. सोमवती अमावस्यसाठी जेजुरीत काल सुमारे चार लाख भाविक दाखल झाले होते.

**मनाई आदेश**

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काल परभणी जिल्ह्याला भेट दिली. न्यायालयीन कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी आणि आंबेडकरी चळवळीचे नेते विजय वाकोडे यांच्या कुटुबीयांची भेट घेऊन त्यांनी त्यांचं सांत्वन केलं.
आठवले यांनी काल बीड जिल्ह्यात मस्साजोग इथं सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाचीही भेट घेऊन सांत्वन केलं. या हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी. तसंच या प्रकरणाचा तपास जलद गतीनं करण्यात यावा यासाठी केंद्रीय गृहमंत्री आणि राज्याच्या मुख्यमंत्र्याची भेट घेणार असल्याचं आठवले यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. दरम्यान, चित्रपट अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्यासंदर्भात केलेल्या वक्तव्याबद्दल आमदार सुरेश धस यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. बीड जिल्ह्यातली सध्याची परिस्थिती पाहता कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी येत्या 12 जानेवारीपर्यंत मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

**अंत्यसंस्कार**

शिवसेनेचे माजी खासदार आणि ठाण्याचे पहिले महापौर सतीश प्रधान यांच्या पार्थिव देहावर काल ठाण्यातल्या जवाहरबाग स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रधान यांचं रविवारी वृद्धापकाळाने निधन झालं होतं.

**निधन**
नामवंत शल्यचिकीत्सक डॉक्टर सु. प्र. शेंदरकर यांचं काल पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. ते 92 वर्षांचे होते. नांदेड, कोल्हापूर, अमरावती इथं त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून काम केलं होतं.  पुण्यातल्या ससून सर्वोपचार रुग्णालयाचे अधीक्षक तसंच राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेचे सल्लागार म्हणूनही त्यांनी काम केलं होतं.

**ज्युदोस्पर्धा**
मुंबईत झालेल्या कॅडेट वयोगटाच्या राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेत धाराशिव जिल्ह्यातल्या ओमप्रसाद निंबाळकर यानं 90 किलोपेक्षा जास्त वजनी गटात सुवर्णपदक मिळवलं. या सुवर्णपदकासह त्यानं राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेतलं आपलं स्थान निश्चित केलं आहे.

**क्रिकेट**
भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या पुरुष क्रिकेट संघांदरम्यान सुरू असलेल्या बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना ऑस्ट्रेलियानं 184 धावांनी जिंकला. या विजयासह ऑस्ट्रेलियाच्या संघानं मालिकेत 2-1 अशी आघाडी मिळवली आहे. तसंच भारतीय संघ जागतिक कसोटी अजिंक्यपदाची अंतिम फेरी गाठण्याची शक्यताही कमी झाली आहे. चौथ्या सामन्याच्या पाचव्या दिवशी भारतासमोर विजयासाठी 340 धावांचं लक्ष्य होतं. मात्र भारताचा दुसरा डाव 155 धावातच आटोपला. या मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना येत्या शुक्रवारपासून सिडनी इथं खेळला जाणार आहे.

**हवामान**
राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील तसंच येत्या दोन दिवसात किमान तापमानात काहीशी घट होण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**